## परिशिष्ट - 6 ब

## जिल्हाधिकारी पुणे, जि.पुणे यांचेकडुन

क्र.पसन/कावि/५४६/नपा/निवडणूक/2018 दिनांक १३/04/2018

1. मा.राज्य निवडणूक आयुक्त,महाराष्ट्र यांचेकडील आदेश क्रमांक रानिआ/नप-2018/प्रक्र02/का.06 दि.20/03/2018 व आदेश क्रमांक रानिआ/नप-2016/प्र.क्र.07/का-06, दिनांक 7/5/2016 अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 (1965 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.40 ) ( यापुढे सदर अधिनियम म्हणून संबोधित केला ) चे कलम 10 (1) खाली **पुणे जिल्ह्याचा जिल्हाधिकारी** निम्नोक्त आदेशाच्या अनुसूचित दर्शविल्याप्रमाणे **भोर नगरपरिषद** क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करण्याचे आणि ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती आणि नागरीकांच्या मागासवर्गासाठी जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग आणि त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती आणि नागरीकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसह ) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग निर्दिष्ट करण्याचे ठरवित आहेत.

2. सदर अधिनियमाच्या कलम 10 पोटकलम (1) परंतुकाप्रमाणे आवश्यक असल्यामुळे उक्त आदेशाचा मसुदा याद्वारे **भोर नगरपरिषद** क्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत असुन याद्वारे सूचना देण्यात येते की, उक्त आदेशाचा मसूदा तारीख 17/04/2018 पासून जिल्हाधिकारी,पुणे विचारात घेतील.

3. उक्त आदेशाच्या मसुद्यास ज्या लोकांच्या हरकती असतील त्यांनी त्या हरकती सकारण **जिल्हाधिकारी, पुणे** यांचेकडे दिनांक 17/04/2018 ते 24/04/2018 दरम्यान कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. उक्त तारखेनंतर आलेल्या हरकती जिल्हाधिकारी विचारात घेणार नाहीत. ( हरकती व सुचना दाखल करण्याचे ठिकाण :- **भोर नगरपरिषद,भोर** कार्यालयीन वेळेत )

### आदेशाचा मसुदा

1. ज्याअर्थी महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 ( सन 1965 या महाराष्ट्र 40 ) च्या कलम 9 पोटकलम - 2 अन्वये मा. आयुक्त व प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन, पुणे यांचे कडील आदेश क्र. नपाप्र-1/कावि 86/2018 दिनांक 22/02/2018 (महाराष्ट्र शासन राजपत्र) च्या आदेशान्वये त्यांनी **भोर नगरपरिषदेच्या बाबतीत** खाली दर्शविल्याप्रमाणे निवडावयाच्या सभासदांची संख्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी ) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केलेल्या आहेत.

(1) निवडावयाच्या सभासद संख्या :- 17

(2) अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व
नागरीकांचा मागासवर्ग यासाठी राखून
ठेवावयाच्या जागांची संख्या

| | |
|---|---|
| (अ) अनुसुचित जाती | :- 01 |
| (ब) अनुसूचित जमाती | :- 00 |
| (क) नागरीकांचा मागासवर्ग | :- 05 |

(3) स्त्रियांसाठी (अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्गच्या स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन ) :- 09

(4) उपरोक्त क्रमांक 3 पैकी वरील क्रमांक 2 (अ), (ब) व (क) येथील जागांमध्ये अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्गच्या स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| (अ) अनुसुचित जाती | :- 01 |
| (ब) अनुसूचित जमाती | :- 00 |
| (क) नागरीकांचा मागासवर्ग | :- 03 |

(5) स्त्रियांसाठी सर्वसाधारण जागा म्हणुन राखून ठेवावयाच्या जागांची संख्या (अनुक्रमांक 3 समोरील नमुद केलेल्या जागा - 4 समोरील नमुद केलेल्या जागा ) :- 05

2. त्याअर्थी आता राज्य निवडणूक आयुत महाराष्ट्र यांचेकडील रानिआ/नप-2018/प्रक्र02/का.06 दि.20/03/2018 व आदेश क्रमांक रानिआ/नप-2016/प्र.क्र.07/का-06, दिनांक 7/5/2016 व महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 10 पोटकलम 1 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन **मी, सौरभ राव** पुणे जिल्हयाचा जिल्हाधिकारी यादवारे उक्त नगरपरिषद क्षेत्र जितक्या भागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती या आदेशाच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित करीत असुन ज्या प्रभागांमध्ये यथास्थिती अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग यांच्यासाठी व स्त्रियांसाठी ( अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांच्या मागासवर्गातील स्त्रियांसह ) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग निर्दिष्ट करीत आहे.

3. या आदेशाच्या तारखेच्या निकट नंतरच्या पुढील सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रयोजनार्थ हा आदेश अंमलात येईल.

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव, असल्यास | प्रभागाची व्याप्ती | जागा राखीव असल्यास कोणासाठी जसे जसे अनु.जाती/अनु. जमाती /नागरीकांच्या मागास वर्गासाठी वा स्त्रियांसाठी (अनु.जाती स्त्रियांसाठी /अनु.जमाती स्त्रियांसाठी /नागरीकांच्या मागासवर्ग स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | | **उत्तर-** निरा नदी<br><br>**पुर्व-** निरा नदी फडणीस घाट ते न्हावी परिट आळी ते भेलकेवाडी मारुती मंदीर ते मळेकर घर<br><br>**दक्षिण-** महाड पंढरपुर रस्ता<br><br>**पश्चिम** - निरा नदी ते मांगिरी ओढा ते निरा कॅनॉल ते महाड पंढरपुर रस्ता | **1 अ - नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला)**<br><br>**1-ब - सर्वसाधारण** |
| 2 | | **उत्तर**- निरा नदी<br><br>**पुर्व**- जनता बँक ते भणगे बोळ ते न्यायाधीश निवास ते भोरेश्वर मंदीर ते सिंधीया पार्क ते माउली विहार ते दत्तकृपा अपार्टमेंट ते मारुती मंदीर ते गणेश देशपांडे घर ते चंद्रकांत पारवे घर ते विनायक सागळे घर<br><br>**दक्षिण**-दत्त मंदीर ते तानाजी तारु घर ते विनायक सागळे घर<br><br>**पश्चिम**- निरा नदी ते नांदुसकर घर ते महालक्ष्मी कॉम्पलेक्स ते जग्गनाथ गिरे घर ते आम्रपाली सोसायटी ते रामचंद्र सुर्यवंशी घर ते भेलके घर ते धोंडीबा कुरुपकर घर ते विलास भेलके घर ते तुकाराम रोमन घर ते शंकर भेलके घर | **2 अ - नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग**<br><br>**2ब- सर्वसाधारण (महिला)** |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | | **उत्तर-** राजवाडा ते पंचायत समिती कार्यालय ते विवेक पाटणकर घर ते किसन गुरव घर ते आपटीकर घर ते निरा नदी<br><br>**पुर्व-** नवा पुल जकात नाका ते वाघ घर ते मारुती कदम घर ते रमेश ओसवाल घर ते संघवी टॉवर ते पांडुरंग पवार घर ते बबन राऊत घर<br><br>**दक्षिण-** लक्ष्मण वाळंबे घर ते रामचंद्र शिवतरे घर ते मधुकर पुरोहित घर ते नवी आळी बागे पर्यंत<br><br>**पश्चिम-** राजवाडा ते जिजामाता शिक्षण संस्था ते फॉरेस्ट ऑफीस ते मुकबधिर विद्यालय | **3 अ - नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग**<br><br>**3ब- सर्वसाधारण (महिला)** |
| 4 | | **उत्तर-** निरा नदी<br><br>**पुर्व-** सर्वे नं 24 व सर्वे नं 25 व रामबाग ओढा<br><br>**दक्षिण-** दिलावर शेख घर ते रामचंद्र मळेकर घर ते भोर न्यायालय ते सर्वे नं 24 व सर्वे नं 25<br><br>**पश्चिम-** निरा नदी ते नवा पुल जकात नाका ते खानदेश स्वीट होम ते केतु कांबळे घर ते नझीर आतार घर ते रामचंद्र पारखी घर ते भाजी मार्केट ते कृष्णा कॉम्पलेक्स ते शेटे घर ते गंगुताई पंतसचिव वाचनालय ते भोर नगर परिषद इमारत ते दिलावर शेख घर | **4अ - अनुसुचित जाती (महिला)**<br><br>**4 ब - सर्वसाधारण** |
| 5 | | **उत्तर-** सोनबा साळुंके घर ते पटणे घर ते महाराणा प्रताप प्राथमिक शाळा ते सर्वे नं 25<br><br>**पुर्व-** सर्वे नं 25 ते रामबाग ओढा<br>**दक्षिण-** मारुती मंदीर ते डॉ.पाटील हॉस्पीटल ते महाराष्ट्र लॉज ते रामबाग जकात नाका | **5अ - नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला)**<br><br>**5 ब - सर्वसाधारण** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **पश्चिम-** सोनबा साळूंके घर ते गायकवाड घर ते हुसेन शेख ते अशोक जाधव घर ते शेलार घर ते गणपत कदम घर ते दिलीप पवार घर ते चौपाटी मारुती मंदीर | |
| 6 | | **उत्तर-** नागोबा मंदीर ते जामा मस्जिद ते नवी आळी शिंदे घर ते न.पा. धर्मशाळा<br><br>**पुर्व-** न.पा. धर्मशाळा ते गणेश मंदिर ते बांदल घर ते पी.डी.सी.सी. बँक ते डॉ.बिराजदार हॉस्पीटल ते आवारे घर<br><br>**दक्षिण-** महाड पंढरपुर रस्ता पंचायत समिती रेस्ट हाऊस ते गणेश म्हस्के घर ते आवारे घर<br><br>**पश्चिम-** नागोबा मंदीर ते तुकाराम तारु घर ते मारुती मोरे घर ते पंचायत समिती रेस्ट हाऊस | **6अ - सर्वसाधारण (महिला)**<br><br>**6 ब - सर्वसाधारण** |
| 7 | | **उत्तर-** तुकाराम तारु घर ते भोईआळी मारुती मंदीर ते भुजाबा धुमाळ घर ते प्रभाकर कानडे घर ते काळे घर<br><br>**पुर्व-** काळे घर ते संगिता हौ.सोसायटी ते दशरथ दुधाणे घर ते डॉ.कंक हॉस्पीटल ते महाड पंढरपुर रस्ता<br><br>**दक्षिण-** महाड पंढरपुर रस्ता<br><br>**पश्चिम-** तुकाराम तारु घर ते विष्णु चोरघे घर ते सुभाष दिघे घर ते आबाजी दिघे घर ते महाड पंढरपुर रस्ता | **7अ - सर्वसाधारण (महिला)**<br><br>**7 ब - सर्वसाधारण** |
| 8 | | **उत्तर-** महाड पंढरपुर रस्ता मांगिरी ओढा ते सहयाद्री मंगल कार्यालय ते अभिजीत मंगल कार्यालय ते रायरेश्वर डोंगरी विकास | **8अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परिषद ते भोर पोलीस स्टेशन ते शिवप्रेरणा बंगला ते गणेश गंगा अपार्टमेंट ते मेढेकर घर ते सदाशिव आंबिके घर ते शेटे घर ते सर्वे नं 54 व सर्वे नं 248 परिसर<br><br>**पुर्व-** सर्वे नं 248 ते सर्वे नं 257 ते सर्वे नं 275<br><br>**दक्षिण-** सर्वे नं 126 ते सर्वे नं 270 ते सर्वे नं 275<br><br>**पश्चिम-** महाड पंढरपुर रस्ता ते सर्वे नं 141 ते सर्वे नं 126 | **8ब- सर्वसाधारण (महिला)**<br><br>**8क- सर्वसाधारण** |

टिप :- 1)अनुसूचिमध्ये नागरिकांचा मागासवर्ग त्याप्रमाणे अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती आणि नागरीकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी ठेवलेले प्रभाग हे दिनांक 13/04/2018 रोजी काढलेल्या चिठ्ठ्या (लॉटस) प्रमाणे निर्दिष्ट करण्यात आलेले आहेत.

2)नगरपरिषद क्षेत्राच्या प्रभागांची सिमा दर्शविणारे नकाशे कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी **भोर नगरपरिषद** कार्यालयात उपलब्ध राहतील.

3)हरकती दाखल करण्याचे ठिकाण :- **भोर नगरपरिषद, भोर** येथे सर्व कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत.

स्थळ :- पुणे
दिनांक :-17/04/2018

जिल्हाधिकारी पुणे

**(सौरभ राव)**
**जिल्हाधिकारी, पुणे**